Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 369-373

DOI: 10.5281/zenodo.10129020

Original Research Article

# महात्मा गांधीचे अस्पृश्यता निवारण प्रासंगिक विचार आणि वास्तव

प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण

सहयोगी प्राध्यापक, मार्गदर्शक व विभाग प्रमुख, लोक प्रशासन विभाग, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना ४३१२१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ptchavan72@gmail.com

Received: 08 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

मोहनदास करमचंद गांधी, महात्मा गांधी म्हणून त्यांना समस्त जगभर ओळखले जाते. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ते प्रमुख व्यक्तीमत्व होते. त्यांच्या विचाराचे अनेक पैलू आहेत. जसे स्वातंत्र्ययोध्दे, समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकीय विचारवंत, धर्मवक्ते तत्वज्ञ. रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांना महात्मा ही उपधी दिली. भारतातील लोक त्यांना प्रेमाने बापू म्हणत. स्वतंत्र भारताचे राष्ट्रपिता असे गांधीजींना इ.स. 1944 मध्ये नेताजी सुभाषचंद्र यांनी संबोधले.

1920 ते 1948 या काळाला गांधी युग म्हटले जाते. राजकारण आणि धर्मकारण परस्परापासून अलग करण्याच्या ते विरोधात होते. उलट राजकारणच धर्माप्रमाणे करावे याचा त्यांनी अग्रह धरला. सामाजिक सुधारणा हृदय परिवर्तन करुन करावे. राज्याने शक्तीचा वापर करु नये. या मताचे महात्मा गांधी होते. व्यक्तीमुळातच चांगला आहे या मतावर ठाम होते. वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, अस्पृश्यता या सारखे भेडसावणारे प्रश्न देखील कायद्याने न सोडवता परिवर्तनाने व प्रामुख्याने हृदय परिवर्तनाने सोडवावेत या मताचे गांधीजी होते.

गांधीजी मानवताच्या कल्याणासाठी सतत कार्य करणारे होते. त्यांच्या मते सामाजिक कार्य सुध्दा राजकारणाला स्पर्श केल्यावाचून शक्य होणार नाही. राजकारण हे कुरघोडीचे नसून सामाजिक व नैतिक उन्नती करण्याच्या उद्देशाने असले पाहिजे.

**अस्पृश्यता**

अस्पृश्यता म्हणजे असे लोक की ज्यांच्या स्पर्शाने किंवा त्यांच्या सावलीने मनुष्य अपवित्र होतो किंवा बाटतो. एका माणासने दुसऱ्या माणसास स्पर्श न करणे म्हणजे अस्पृश्यता होय. जातीय अस्पृश्यता हा प्रकार भारत आणि भारतीय उपखंडात मोठया प्रमाणात आढळून येतो. जातीय अस्पृश्यतेच्या नियमानुसार कनिष्ठ जातीतील लोक हे उच्च जातीतील लोकांना स्पर्श करु शकत नाहीत अशी अशास्त्रीय धारणा होती.

**शोधनिबंधीची गृहितके**

१. महात्मा गांधीच्या विचारामुळे सामाजिक व धार्मिक स्थिती मध्ये सकारात्मक बदल घडून आले आहेत.
२. भारतात अस्पृश्यता निवारण साध्य झाले आहे.
३. अस्पृश्यता निवारणामुळे सामाजिक गुलामगीरी नष्ट झाली आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

१. महात्मा गांधीजीच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा अभ्यास करणे.
२. अस्पृश्यता निवारणामुळे लोकांच्या जिवनात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
३. भारताच्या सामाजिक जिवनात अस्पृश्यता निवारणाचे महत्व स्पष्ट करणे.
४. अस्पृश्य लोकांची सद्यस्थिती जाणून घेणे.

**संशोधन पध्दती**

सदरील शोधनिबंधाच्या प्रस्तृतीकरणासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. ज्यामध्ये वेगवेगळे संदर्भग्रंथ मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट वरील उपलब्ध माहितीचा उपयोग करण्यात आला आहे.

**अस्पृश्यते विषयी महात्मा गांधीचा दृष्टीकोन**

वर्णव्यवस्थेचे रुपांतर जातीव्यवस्थेत झाले. जाती व्यवस्थेने समाजात विषमतेची उतरंडे निर्माण केली. सहाजिकच तथाकथीत श्रेष्ठ जाती कनिष्ठ जातीचे शोषण करुन लागल्या या मधूनच पुढे अस्पृश्यतेचा उगम झाला गांधी म्हणतात,“ अस्पृश्यता ही जाती व्यवस्थेचा भाग बनला असून हिंदू धर्मावरील तो एक मोठा कलंक आहे. हा कलंक धुऊन काढण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे. ”

या प्रथेमुळे समाजातील आर्थिक दृष्टया दुर्बल, मागास, आदिवासी आणि स्त्रिया यांचे शोषण झाले आहे. त्यांना पदोपदी मान-अपमानाचे जीवन जगावे लागते. त्यासाठी ही प्रथा संपुष्टात आली पाहिजे असे त्यांचे मत होते. यासाठी म्हणतात त्यांच्या शब्दात *“अस्पृश्यता ही अमानवी प्रथा ईशरनिर्मीत नसून मानव निर्मीत आहे. समाजातील काही विशिष्ट जाती समुहांनी आपले स्वार्थी हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी जाणून बुजून निर्माण केलेली आहे.”*

महात्मा गांधीचा अस्पृश्यते विषयीचा दृष्टीकोन निंदणीय स्वरुपाचा होता. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविला जावा तो पाळणाऱ्यास शिक्षा दिली जावी. या संदर्भात 'यंग इंडिया' मधील एका लेखात (1920) ते म्हणतात "अस्पृश्यतेच्या पालनाने हिंदू स्वातंत्र्यास पात्र होणार नाहीत आणि स्वातंत्र्याची प्राप्ती झाली तरी अस्पृश्यतेच्या पालनाने त्यांचे संरक्षणही त्यांना करता येणार नाही म्हणून हिंदू समाजावर असणारा हा कलंक धुऊन टाकला पाहिजे. कारण कोणत्याच कारणावरुन त्यांचे समर्थन करता येणार नाही."

सर्व समाज घटकाला जो पर्यंत आपण सोबत घेणार नाहीत तो पर्यंत खरे स्वराज्य निर्माण करता येणार नाही असा विचार मांडला. आपल्या कर्तव्याशी प्रमाणीकपणा दाखवत ते म्हणतात "मला जर पुन्हा जन्म घ्यावाच लागाला तर अस्पृश्य म्हणून जन्मास येईल ज्यामुळे अस्पृश्यांच्या खऱ्या आचारांची, दु:खाची मला जाणीव होईल."

**महात्मा गांधींचे अस्पृश्यता निवारण कार्ये**

अस्पृश्यता निवारण करण्यासाठी स्व:ताच्या अनुयायांचा एक गटच निर्माण केला होता. अनुयायांना अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अनेक रचनात्मक कार्यक्रम दिले. मंदिर प्रवेश हरिजन मुलांना दत्तक घेणे, अंतरजातीय विवाह, सर्वोदय संकल्पना इ. गांधीजींना भेटण्यासाठी आंबेडकर मणीभवन येथे भेटण्यासाठी गेल्यावर गांधी म्हणतात, "काँग्रेसच्या कार्यक्रमात हा अस्पृश्यांचा प्रश्न गोवतांना मला अतिशय प्रयास पडले. सामाजिक व धार्मीक प्रश्न असल्याने मला त्यावेळी फार विरोध झाला. हिंदू मुसलमानांच्या प्रश्नांपेक्षाही अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न मी अधिक महत्वाचा व जिव्हाळयाचा मानतो म्हणून अस्पृश्यांसाठी काँग्रेसने वीस लाख रुपये खर्च केले आहेत."

अस्पृश्यतेच्या प्रश्नावर गांधीचे विचार संभ्रम निर्माण करणारे होते. त्यामुळे ही मानसिकता आजही देशभरात व्यापक प्रमाणात आहे. अस्पृश्यता संपूर्ण नष्ट झाली नाही ? या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

१. अस्पृश्यता जातियतेची निर्मीती आहे. जो पर्यंत जातियता संपणार नाही तो पर्यंत अस्पृश्यता संपणे कठीण आहे कारण गांधीजी वर्णव्यवस्थेचे समर्थन करतात अशा प्रकारची प्रतिकुलता असतांना अस्पृश्यता कशी संपणार.
२. गांधीजीच्या अस्पृश्यता निवारण चळवळीला दिखाऊ समजले जाते कारण हिंदू गांधीजीच्या राजकीय आदेशाचे पालन तर करतात पण त्यांच्या सामाजिक व धार्मीक उपदेशांवर लक्ष देत नाहीत.
३. वर्ण व्यवस्थेच्या कायद्यानुसार प्रत्येकाने जगण्यासाठी आपल्या वाडवडीलांचा कायदेशीर व्यवसाय केला पाहिजे. परंतू एका सफाई कामगाराचा दर्जा ब्राम्हणासारखाच राहिल.
४. गांधीजी भंगी कॉलनीमध्ये राहिले तिथे राहून त्यांनी भंग्याची उठावाची आगमंद केली. सत्तेत व प्रशासनात त्यांची भागीदारी नाममात्र ही नाही. गांधीजी म्हणतात भंग्याचा दर्जा बादशाहच्या समान आहे. भंग्याला आपल्या व्यवसायाची शरम वाटायला नको. माझ्या विचारातील आदर्श भंगी एका ब्राम्हणापेक्षा ही योग्य असेल त्याच्या पेक्षाही जास्त चांगला.

५. गांधीजी आरक्षणाच्या विरोधात होते. त्यांच्या शब्दात या विरोधाचे वर्णन केले जाते ते म्हणतात, "मला म्हणावे लागेल की मी कायदेशीर आरक्षणाच्या बाजूने बिलीकुल नाही. मला कवडीचीही शंका नाही की यामुळे दलित वर्गाच्या नैसगीक विकास थांबेल. जगाच्या कायदेशीर आरक्षणाच्या विरोधात मी उपोषण करणार नाही. परंतू अशा कोणत्याच योजनेला माझ्या आशिर्वादाची आशा ही धरु नये. हे कायद्याने नैसर्गीक विकासाच्या विरुध्द आहे. ही अशी कुबडी आहे, ज्यामुळे आधार घेणारा स्वत:ला कमजोर करुन घेईल."

गांधीजीची काही वक्तव्ये अशी आहेत ज्याद्वारे त्यांची अस्पृश्यतेसंबंधी वास्तविक मनोवृत्ती ओळखू येते.

१. जरी अस्पृश्य़ यांनी मुसलमान किंवा ख्रिश्चन धर्माची दिक्षा घेतली तरी मला काही पर्वा नाही. काही चिंता नाही मी ते सहन करेन परंतू मी प्रत्येक गावाचे विभाजन होईल हे सहन करु शकत नाही आणि हे हिंदुवादा सोबत होणार नाही.
२. मी दुसरा जन्म घेऊ इच्छित नाही परंतू जर मला (पुनर्जन्म़) दुसऱ्यांदा जन्म झाला तर तो भंगी कुटूंबात व्होवो जेणे करुन मी त्यांना डोक्यावरुन मैला वाहून नेण्यासारखा अमानवीय अरोग्यास अपायकारक आणि तीरस्करणीय कार्यातून मुक्ती देऊ शकेन.

**मुल्यमापन**

गांधीजींच्या अस्पृश्यता निवारणाच्या दुहेरीपणाची पुष्टी तत्कालीन व्हॉईसराय लॉर्ड वेलिंगटन यांनी ही केली आहे. बादशाह पंचम जॉर्ज यांना 29 सप्टेंबर 1933 रोजी गांधीजी बाबत लॉर्ड वेलिंगटन यांनी या प्रकारे लिहले. "गांधीचे मोठे वैशिष्टे हे आहे की, गर्विष्ट़ आहेत त्यांची व्यापाऱ्यासारखी नेहमी सौदेबाजी करण्याची इच्छा असते. गांधी बाबत बराच अनुभव आल्यामुळे माझा हा विश्वास आहे की, त्यांची दलित वर्गाबाबत गंभीर दिसणारी सहानुभूती वास्तवात कटकारस्थान आहे. आतून तो एक अतिशय स्वार्थी आणि मतलबी तुच्छ राजकारणी आहे. जो कधी विद्यमान राहिला असेल. अस्पृश्याने स्पर्श केल्यामुळे विटाळ होतो. अशी स्पृर्शाची भावना होती. अस्पृश्यता म्हणजे एक प्रकारची सामाजिक गुलामी असून त्याला धर्ममान्यता होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात अस्पृश्यता दूर करावयाची असेलतर अस्पृशांना राजकीय अधिकार मिळायला पाहिजेत ते सत्ता स्थानी गेले पाहिजे. अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार अस्पृशांनाच मिळाला पाहिजे. लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचे प्रतिनिधी निवडले पाहिजे."

गांधीजी मात्र वर्णव्यवस्था आणि जाती व्यवस्थेचे समर्थन करतात. गांधीजी अस्पृशांना हरिजन असा शब्दप्रयोग करत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे मान्य नव्हते. त्यांचे मत असे होते की, अस्पृश्यता नावात नसून ती मानसिकतेत आहे नामांतर केल्याने अस्पृश्यता संपत नाही.

1930, 31, 32 दरम्यान गोलमेज परिषदा झाल्या 1932 साली इंग्रजांनी जातीय निवडा जाहिर केला या निवाडयाप्रमाणे मुसलमान आणि अस्पृशांना विभक्त मतदार संघ दिले होते. अस्पृश्य समाज हिंदू समाजाचा भाग नाही तो राजकीय दृष्टया अल्पसंख्या आहे. स्वतंत्र अस्पृश्य समाज आहे असा निवाडा दिला. महात्मा गांधींनी अस्पृश्य़ समाज

हा हिंदू समाजाचा अभिन्न असा भाग असल्यामुळे त्याला हिंदूपासून वेगळे करण्याच्या मी विरुध्द आहे. त्यांना राखीव जागा देण्याला मी वास्तविक अनुकूल नाही म्हणून आमरण उपोषण केले व पुणे करार झाला.

**निष्कर्ष**

अस्पृश्यता धर्मबंधनामुळे, सामाजिक रुढी बंधनामुळे आणि समाजाच्या विचारशुन्यते मुळे निर्माण झाली होती. आज धर्मबंधने जवळजवळ कोलमडून पडली आहेत. सामाजिक बंधने पाळण्यात कुणाला वेळ नाही तरी देखील नव्या प्रकारची अस्पृश्यता जन्माला आली आहे सत्ता भोगणारा एक वर्ग भारतात प्रस्तापित झाला आहे. हे आजचे वास्तव आहे.

**संदर्भ सूची**


१. प्रा.कृ. दि. बोराळकर, भारतीय राजकीय विचारवंत विद्या प्रकाशन नागपूर 1991
२. प्रा. डॉ. ढोबळे रमेश, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लीशर्स औरंगाबाद 2010
३. डॉ. श्रीराम निकम, गांधी आंबेडकर अस्पृश्य मुक्ती संघर्ष
४. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉप्युलर प्रकाशन मुंबई. 2006
५. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, कॉग्रेस आणि गांधीनी अस्पृशांप्रती काय केले? क्षितीज पब्लिकेशन
६. एल.आर. बाली, गांधी महात्मा होते का?